आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८, क्वीन्स गार्डन, जुने सर्किट हाऊस जवळ,
पुणे-४११००१

दुरध्वनी- ०२० -२६३६०९४१

E-mail:trti.mah@nic.in
Website: trti.maharashtra.gov.in

जा.क्र. आसंप्रसं/२०२४-२५/स्पर्धा परीक्षा-वि.नि.सु./का- ४/3625 दिनांक : 18/11/2024

## महत्त्वाची सूचना

### स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम २०२४-२५ अंतर्गत प्रशिक्षण योजना निहाय निवड व प्रतीक्षा यादीतील उमेदवारांसाठी संस्था निवडीबाबतची विकल्प लिंक उपलब्ध करून देणेबाबत

या कार्यालयाच्या जा.क्र. आसंप्रसं/२०२४-२५/स्पर्धा परीक्षा/का-४/२९३८ दि. ०३/१०/२०२४ , जा.क्र. आसंप्रसं/२०२४-२५/स्पर्धा परीक्षा/का- ४/३१३२ दि. ०९/१०/२०२४ व क्र. ३४१३ दि. १७/१०/२०२४ रोजीच्या सूचनांनुसार त्यात नमूद केलेल्या विविध **स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनांसाठी पात्र ठरलेल्या अनुसूचित जमातीच्या निवड व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना** संबंधित प्रशिक्षण देणाऱ्या खाजगी नामांकित प्रशिक्षण संस्थेची निवड करण्यासाठी विकल्प देण्याची सुविधा आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या संकेतस्थळावरून संबंधित कालावधीकरिता उपलब्ध करून देण्यात आली होती.

उक्त सूचनांच्या आधारे प्राप्त झालेल्या विकल्पांची संख्या विचारात घेता खाली नमूद योजनांसाठी रिक्त राहणाऱ्या जागांना अनुसरून **प्रतीक्षा यादीतील पुढील उमेदवारांसाठी व ज्या पात्र उमेदवारांनी वरील सूचनांमध्ये नमूद कालावधीत कोणत्याही योजनेकरिता विकल्प नोंदविले नाहीत अशा सर्व उमेदवारांसाठी प्रशिक्षण संस्था निवडीकरिता विकल्प लिंक दि. १९/११/२०२४ रोजी सायं. ०५.०० वाजेपासून दि. २५/११/२०२४ रोजी रात्री ११.५९ पर्यंत** पुढे नमूद केलेल्या योजनांकरिता उपलब्ध करून देण्यात येत आहे.

१. संघ लोकसेवा आयोग नागरी सेवा स्पर्धा परीक्षा (Union Public Service Commission) पूर्व प्रशिक्षण योजना – महाराष्ट्र
२. महाराष्ट्र लोकसेवा आयोग – राज्यसेवा स्पर्धा परीक्षा (MPSC Gazetted State Services) पूर्व प्रशिक्षण योजना
३. महाराष्ट्र लोकसेवा आयोग अंतर्गत महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा (Maharashtra Engineering Services) स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजना
४. MPSC/राज्यातील इतर नियुक्ती प्रधिकरणाकडून घेण्यात येणाऱ्या वर्ग ३ पदांच्या स्पर्धा परीक्षा (MPSC Non-Gazetted Group C Services) पूर्व प्रशिक्षण योजना
५. बँक (IBPS) रेल्वे, एलआयसी NABRARD (Grade A & B), SBI, (PO/SO/ Clerical), RBI, Insurance, LIC, Regional Rural Banks (RRB), (PO/Clerical) and other Banking Competitive Examination पूर्व प्रशिक्षण योजना
६. केंद्रीय सेवेमार्फत घेण्यात येणाऱ्या वर्ग – ३ च्या पदांकरीता स्पर्धा (Saff Selection Commission) पूर्व प्रशिक्षण योजना
७. महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (Teachers Eligibility Test) पूर्व प्रशिक्षण योजना
८. महाराष्ट्र लोकसेवा आयोग – PSI STI ASO पदांकरिता स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजना

**विकल्प सुविधा लिंक: https://cpetp.trti-maha.in/**

पूर्व प्रशिक्षण संस्थेची निवड करण्याकरिता ऑनलाइन विकल्प देण्याची कार्यवाही करण्यापूर्वी निवड झालेल्या तसेच प्रतीक्षा यादीतील उमेदवारांनी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या संकेतस्थळावर दि. २०/०९/२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या सूचना क्र. आसंप्रसं/२०२४-२५/स्पर्धा परीक्षा/का- ४/२७५९ यांचे काळजीपूर्वक वाचन करणे आवश्यक आहे

प्रत्येक स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमा अंतर्गत देय असलेले प्रशिक्षण शुल्क व प्रशिक्षणार्थींना देण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभाबाबतची सविस्तर माहिती (Stipend and any other payments as applicable) ही यापूर्वीच आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. उमेदवारांनी सर्व माहिती पडताळून त्यानंतरच आपली योजना व प्रशिक्षण संस्था विकल्प देण्याची कार्यवाही पूर्ण करावी.

पूर्व प्रशिक्षण संस्थेच्या निवडीकरिता ऑनलाइन विकल्प देण्यासाठी संबंधित लिंक वरून लॉगीन करणे आवश्यक आहे. **आपले लॉगीन आयडी व पासवर्ड हे संबंधित उमेदवारांना त्यांनी प्रवेश अर्ज (Application Form) भरताना वापरलेल्या Email ID वर पाठविण्यात येतील. सबब उमेदवारांनी सदर ईमेल व मोबाईल क्रमांक सदरची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत चालू स्थितीत ठेवणे आवश्यक आहे.** ज्या उमेदवारांनी पूर्वी विकल्प दिले नाहीत अशा निवड व प्रतीक्षा यादीतील पुढील उमेदवारांनाच आत्ता विकल्प देण्याची सुविधा उपलब्ध राहील.

**जर एखादा उमेदवार एकाहून अधिक स्पर्धा परीक्षा योजनांसाठी पात्र/प्रतीक्षाधीन (Merit/Waitlised) ठरला असेल तर त्याने/तिने आपल्या पसंतीनुसार केवळ एकाच योजनेची निवड करणे आवश्यक आहे.**

**ज्या योजनेची निवड उमेदवाराने केली असेल ती अंतिम मानण्यात येऊन** त्या योजनेशी संबंधित नामनिर्देशित खाजगी नामांकित प्रशिक्षण संस्थांचे विकल्प देण्याची सुविधा उपलब्ध होईल. जितक्या संस्था नमूद आहेत त्या सर्वांना उमेदवारांनी पसंतीक्रम/विकल्प (Preference) द्यायचा आहे. सर्व संस्थांना पसंतीक्रम/विकल्प दिल्यानंतर OTP द्वारे सदर पसंतीक्रम/विकल्प सत्यापित (verify) केल्यानंतरच आपले पसंतीक्रम/विकल्प Submit करण्याचा Tab कार्यान्वित होईल. Submit वर click केले असता आपले पसंतीक्रम/विकल्प नोंद होऊन त्याची Acknowledgement Receipt (पोच पावती) तयार होईल. **OTP द्वारे जोपर्यंत आपण विकल्प सत्यापित (verify) करत नाही तोपर्यंत आपले विकल्प अंतिम होणार नाहीत.**

***प्रशिक्षण संस्थांचे विकल्प देणे ही उमेदवाराची स्वत:ची जबाबदारी आहे. त्यासाठी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत कोणत्याही प्रकारे उमेदवारांशी संपर्क साधून त्यांचे इमेल अथवा मोबाईल क्रमांकावरील OTP मागितला जात नाही. उमेदवारांना सतर्क करण्यात येते की अशाप्रकारच्या भूलथापांना बळी पडू नये. उमेदवारांनी आपले SMS/ ईमेल व OTP कोणासही देऊ नये. अशा प्रकारे कोणाही त्रयस्थ व्यक्तीस/संस्थेस उमेदवारांनी OTP दिल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी ही उमेदवाराची राहील याची काळजीपूर्वक नोंद घ्यावी.***

**सदर प्रमाणे प्राप्त झालेले पसंतीक्रम/विकल्प हे अंतिम असून त्यात कोणताही बदल करता येणार नाही**, सबब उमेदवारांना सूचित करण्यात येते की त्यांनी योजनेची निवड अत्यंत काळजीपूर्वक करावी तसेच प्रशिक्षण संस्थांचे विकल्प हे त्यांच्या संदर्भातील उपलब्ध माहिती View Details Tab मधून वाचून तसेच आवश्यक असल्यास संबंधित संस्थेशी संपर्क करून भरावे.

सदर विकल्प लिंक वर Contact Us या Tab/शीर्षकाखाली सर्व संबधित योजनांचे **योजनानिहाय संपर्क Email ID दिले** आहेत. **तसेच विकल्प लिंक वर लॉगीन केल्यानंतर Support या Tab/शीर्षकाखाली Raise A Ticket या सुविधेद्वारे आपली समस्या नोंदविण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे.** सर्व उमेदवारांना सूचित करण्यात येते की त्यांनी केवळ याच मार्गाने आपल्या समस्या नोंदवाव्या. इतर कोणत्याही Email तसेच संपर्क क्रमांकावर आपल्या तक्रारी अथवा समस्येची नोंद घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

त्याचबरोबर काही अपरिहार्य कारणास्तव उमेदवारांचा Mobile Number बदलणे आवश्यक असल्यास तशी सोय त्यांच्या स्वतःच्या login केल्यानंतर दिसणाऱ्या Profile Section मध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**अत्यंत महत्वाचे:**

१. **विकल्प सादर करण्याची संधी ही कोणत्याही प्रकारे आपला संबंधित योजनेकरिता प्रवेश निश्चित झाल्याची खात्री देत नाही याची नोंद घ्यावी. योजनानिहाय मंजूर लाभार्थी संख्या, संबंधित खाजगी नामनिर्देशित प्रशिक्षण संस्थांमधील उपलब्ध प्रशिक्षणार्थी क्षमता, उमेदवारांचा पसंतीक्रम व उमेदवारांचा गुणानुक्रम या सर्व बाबींना अनुसरूनच प्रशिक्षण संस्थांमध्ये संबंधित उमेदवारास प्रवेश दिला जाईल.**

२. तसेच दि. २०/०९/२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या सूचना क्र. आसंप्रसं/२०२४-२५/स्पर्धा परीक्षा/का-४/२७५९ नुसार कागदपत्र पडताळणीअंती उमेदवारांचा प्रवेश अंतिम करण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

३. पडताळणीच्या आणि/व योजनेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवार हा दुबार लाभ घेत असल्याचे आढळून आल्यास त्याचा प्रवेश तात्काळ रद्द करण्यात येईल याचीही नोंद घ्यावी.

(**डॉ. राजेंद्र भारुड,** भा. प्र. से.)
**आयुक्त**
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे